# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २१-०६-२०१३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक २१-०६-२०१३ रोजी (का.प.क्र.१४) मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.३५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.उपआयुक्त (म).,नगरसचिव श्री.ओ सी सिरसाट तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स.श्री. नारायण तिलोकचंद कुचे
३. स.स.श्री खेडकर सुशिल तुकाराम
४. स.स. डॉ. खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२३. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२८. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२९. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३०. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
३१. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३२. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३६. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३७. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
४०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४२. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४३. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४४. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४५. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४६. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४७. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४८. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा

५०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५२. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५३. स.स.श्री.खान आगा मिया खान
५४. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५५. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५६. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५७. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५८. स.स. श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
५९. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६०. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६१. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
६२. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६३. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६५. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६६. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
६७. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६८. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६९. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७०. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७१. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७२. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७३. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७४. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७५. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
७६. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७७. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७८. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७९. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

८०. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे

०१. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

०२. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

०३. श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री. गिरजाराम हाळनोर :उत्तराखंडमध्ये महाप्रलय झाला त्यात अनेक यात्रेकडून भावीक मुत्यूमुखी पडले त्यांसर्व हुतात्म्यांना श्रध्दांजली,अर्पण करावी जे भाविक अजुनही त्या भागात अडकलेले आहे.त्या सर्वांची सुटका लवकर होवो.अशी प्रार्थना करतो.

श्री. महेश माळवतकर : यास माझे अनुमोदन आहे..

डॉ जफर खान : डॉ.कूरुंदकर यांचे दुःखद निधन झाले त्यांना श्रध्दांजली.अर्पण करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : यास अनुमोदन आहे

मा. महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

यावेळी उत्तराखंड येथील मृत्यु झालेल्या यात्रेकरू भविकांना तसेच तज्ञ डॉ कुरुंदकर यांना २ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

डॉ जफर खान : १७ तारखेला शाळा सुरू झाल्या झाल्या त्या दिवशी शाळेत येणा-या विदयार्थ्याचे स्वागत करण्याची संकल्पना राज्याचे मा.मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री तसेच या शहराचे मा.आमदार श्री. राजेंद्र दर्डा यांनी आणली त्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :यासाठी विरोधी पक्ष नेता मा श्री. खडसे साहेब यांचा ही पांठीबा होता त्यांचे अभिनंदन करावे.

श्री मिलींद दाभाडे :विद्यार्थ्यांचे स्वागत हा अभिनंदन ठरावाचा विषय होत नाही शासनाने निधी उपलब्ध करून दिला असेल तर असेल तर ठराव घ्यावा.

श्री.मीर हिदायत अली : स्थायी समितीने बजेट देवून २-३ महिने झाले अदयाप बजेटबुक अंतिम झाले नाही वार्डात १० लक्षचे काम होत नाही.

मा. महापौर : ४-५ दिवसात बजेटबुकचे काम पूर्ण होईल

श्री. प्रमोद राठोड :बजेट अंतिम करण्याचे अधिकार सभागृहाने आपणांस दिले आहे वार्डात विकास कामे होण्यासाठी निधी उपलब्ध करून दयावा

श्री. खान जहाँगीर :बीओटी चे लाईट बंद आहे अधिकारी ऐकत नाही.

**<u>विषय क्रमांक २४१:-</u>**

दिनांक १८.१०.२०१२ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४९), दिनांक २८.०३.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०९), दिनांक ३०/०४/२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ११) व दिनांक २०/०५/२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक १२) रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री. अफसर खान : दिनांक १८-१०-२०१२ चे इतिवृत्तातील विषय क्र. ९३२ मधील मनपाची खुली जागा कायम स्वरूपी देण्याचा ठराव आहे ती कायम स्वरूपी कशी देण्यात आली.ती देता येते का या विषयावर चर्चा सुध्दा झाली नाही माझ्या माहिती प्रमाणे विनामुल्य जागा देता येत नाही बॅडमिटन हॉल सभागृह असेल तर ते तात्पुरते भाडेतत्वावर देतो ही कायम स्वरूपी जागा कशी देत आहोत माहिती दयावी.

श्री. प्रमोद राठोड :इतिवृत्त मंजूरीसाठी आहे प्रशासनाचा खुलासा घ्यावा कार्यवाही केली का ?

श्री.अफसर खान :इतर वार्डातही खुल्या जागा आहे त्याही देणार का ? कायम स्वरूपी जागा देता येत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी असे म्हटले नियमात बसेल तर प्रशासन कार्यवाही करील

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खान :या दिवशीच्या बैठकीत हा विषय आलेला नव्हता आम्हाला माहित नाही इतिवृत्तात कसे टाकले.

श्री. काशिनाथ कोकाटे : इतिवृत्त उशीरा आले म्हणून शंका येत आहे किती जागा विनामुल्य दिल्या कोणत्या संस्थाना दिल्या सर्व माहिती द्यावी

श्री. रेणुकादास वैद्य : प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी याचा अर्थ जागा देता येत असेल तर नियमानुसार कार्यवाही करील.

श्री.काशिनाथ कोकाटे :कोणत्या नियमानुसार मंजूर करणार आहे कायमस्वरूपी देता येते का

मालमत्ता अधिकारी : रेखांकनातील खुल्या जागेवर १० टक्के बांधकाम अनुज्ञेय राहते सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या मंजुरीने जे सभागृह हॉल बांधलेले आहे त्याचे तेथील स्थानिक नागरीकाकडून भाडे घेतो आहे .

श्री. मिलींद दाभाडे :कायमस्वरुपी शब्द वापरला आहे कायमस्वरुपी देता येते का?

श्री.काशिनाथ कोकाटे :कोणत्या दैनिकात या संदर्भात जाहिरात केली याची निविदा झाली का किती निविदा आल्या आब्जेक्शन किती लोकांचे आले.

श्री. राजु शिंदे : नियमानुसार अशी जागा देता येते का

मालमत्ता अधिकारी :रेखांकनातील ही खुली जागा आहे

श्री गिरजाराम हाळनोर :प्रशासनाचा प्रस्ताव नाही स.सदस्यांनी दिलेला प्रस्ताव आहे.

श्री. मुजीब खान :कायमस्वरूपी जागा देता येते का ,प्रशासनाने कार्यवाही केली का

श्री. जगदिश सिध्द :असे प्रस्ताव घेवू नये.

मालमत्ता अधिकारी :या विषय संदर्भाने जागा अदयाप दिली नाही विनामुल्य देता येत नाही

श्री. राजु शिंदे : अद्यापपर्यंत ९३२ बद्दल का कार्यवाही केली नाही.

श्री. सुशिल खेडकर :प्रशासनाने खुलासा केला आहे. विषय पात्रिकेस सुरुवात करावी

श्री.मिलींद दाभाडे :आजच्या बाजारभावाप्रमाणे त्या जागेची किमंत किती आहे

उपआयुक्त (म) : संस्थेला अद्याप ही जागा देण्यात आली नाही. जागा देता येत नाही अजून दिली नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा केलेला आहे इतिवृत्त कायम करण्यात येते.

श्री. अनिल जैस्वाल : स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे तैलचित्र या सभागृहात लावण्यात येणार होते उशीर का झाला

मा.महापौर :प्रशासनाने या बाबत तात्काळ कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :१८-१०-१२ त्या नंतर २८-३-१३ चे इतिवृत्त सादर केले याचे मधल्या काळातील इतिवृत्त का दिले नाही.

नगरसचिव :यामधील कार्यकाळातील इतिवृत्तांत कायम झालेले आहे.

**ठराव :**

दिनांक १८.१०.२०१२ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४९), दिनांक २८.०३.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०९), दिनांक ३०/०४/२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ११) व दिनांक २०/०५/२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक १२) रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २४२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८५ गारखेडा येथील काबरा नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर  प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात यावे.

करीता या कामासाठी रक्कम रु.१० लक्ष रुपयाची तरतुद करण्यात यावी. म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर

सुचकः-श्री.सुशिल तुकाराम खेडकर अनुमोदकः- श्री.गजानन बारवाल,श्री. गिरजाराम हाळनोर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८५ गारखेडा येथील काबरा नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर  प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी रक्कम रु.१० लक्ष रुपयाची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९९ शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी चौक सी. सेक्टर मध्ये मनपाच्या खुल्या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी प्रभागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.२५ लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती छाया वेताळ.

अनुमोदकः- श्री.सुशिल तुकाराम खेडकर, श्री. रेणुकादास (राजु) वैद्य.

श्री. रेणुका दास वैद्य : या संदर्भात कमिटी नेमावी.

मा.महापौर :विविध भागात पुतळे करण्या संदर्भात आजच्या विषय प्रत्रिकेवर प्रस्ताव आलेले आहे. या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिति गठीत करण्यात यावी समितीत  प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे

स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार कार्यवाही व्हावी.

श्री.त्रिंबक तुपे :पुतळा समितीच्या मार्फत ठराव यावा.

डॉ.जफर खान :मा.सुप्रिम कोर्टाच्या काही गाईडलाईन्स आहे त्याचा विचार होवून कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :शासनाचे नियम व मा. कोर्टाचे निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही व्हावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक २४४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४ अंतर्गत खडकेश्वर येथे महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. या ठिकाणी श्रावणात व महाशिवरात्रीला तसेच दररोज या मंदिरात गर्दी असते. या मंदिरा समोर चौक असून या चौकास श्री.महेश चौक असे नाव देणेसाठी या भागातील नागरीकांनी मागणी केलेली आहे.

तरी या चौकास श्री. महेश चौक असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती प्राजक्ता विश्वनाथ राजपुत.

अनुमोदकः- श्रीमती. प्रिती तोतला,श्रीमती सुनिता सोनवणे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३४ अंतर्गत खडकेश्वर येथे महादेवाचे प्राचीन मंदिर असून या मंदिरा समोरील चौकास श्री. महेश चौक असे नाव देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २४५ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, वॉर्ड क्र.२४ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत असलेल्या मुकुंदवाडी येथील एस.टी. वर्कशॉप जवळील चौकात लोकप्रबोधनकार तथा लोककवी वामनदादा कर्डक यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. तसेच पुतळा उभारण्यासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्री. राजु शिंदे अनुमोदकः- श्री. रवी साहेबराव कावडे, श्री.बाळूलाल गुर्जर, डॉ. खान जफर अहमद, श्री. संजय चौधरी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात

पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २४६ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा हद्दीतील कोणत्याही प्रकारच्या कामाची उदा. रेट लिस्ट, ए.वन, बी.वन कामासंबंधी त्या त्या वॉर्डाच्या नगर सेवकांचे पत्र अनिवार्य करावे व त्या त्या विभागातील उपअभियंत्यांनी कामासंबंधी माहिती नगर सेवकांना द्यावी व तसेच कोणत्याही प्रकारच्या कामाची संचिका संबंधित वॉर्डाच्या नगरसेवकाला कळवूनच खतवण्यात यावी व काम पुर्ण झाल्याचे नगरसेवकाचे पत्र संचिकेत नसल्यास कामाचे देयक अदा करण्यात येऊ नये.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्री. अशोक किसनराव बेहडे अनुमोदकः- श्री.अफसर खान यासीन खान.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा हद्दीतील कोणत्याही प्रकारच्या कामाची उदा. रेट लिस्ट, ए.वन, बी.वन कामासंबंधी त्या त्या वॉर्डाच्या नगर सेवकांचे पत्र अनिवार्य करण्यास व त्या त्या विभागातील उपअभियंत्यांनी कामासंबंधी माहिती नगर सेवकांना देण्यास व तसेच कोणत्याही प्रकारच्या कामाची संचिका संबंधित वॉर्डाच्या नगरसेवकाला कळवूनच खतवण्यास व काम पुर्ण झाल्याचे नगरसेवकाचे पत्र संचिकेत नसल्यास कामाचे देयक अदा न करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २४७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९५ पदमपुरा अंतर्गत लालमन कॉलनी जवळील महाराणा प्रताप गार्डन मध्ये महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी प्रभागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागे वर महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.२० लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती सुनिता भारत बरथुने. अनुमोदकः- श्री.गजानन बारवाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिति गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २४८ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र ९५ पदमपुरा अंतर्गत संत रोहीदास चौकात मनपाच्या खुल्या जागेवर संत शिरोमणी गुरु रोहीदास महाराजांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी प्रभागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागेवर संत शिरोमणी गुरु रोहीदास महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु. २० लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती सुनिता भारत बरथुने.

अनुमोदकः- श्रीमती कौशल्याबाई बन्सीलाल गांगवे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २४९ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन/५ व एन/६ चिस्तीया पोलिस चौकी समोरील चौकात थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी प्रभागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागेवर थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.२५ लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री.विरभद्र गादगे.

अनुमोदकः- श्री. किशोर नागरे. श्रीमती प्राजक्ता मंगेश भाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २५० :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत तुकाराम महाराज नाटयगृहासमोर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी भागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागेवर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.२५ लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती प्राजक्ता मंगेश भाले. अनुमोदकः- श्री.विरभद्र गादगे, श्री. किशोर नागरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा

त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक २५१ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५९ अजबनगर खोकडपुरा येथील राधामोहन कॉलनीत गार्डन मधील खुल्या जागेवर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा पुतळा उभारण्यात यावा यासाठी प्रभागातील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील जागेवर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.१५ लक्ष ची तरतुद करण्यात यावी. यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती सुनिता सुनिल सोनवणे. अनुमोदकः- श्रीमती प्रिती तोतला.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक २५२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८९, ज्योतीनगर अंतर्गत विश्वरुप हॉल समोरील चौकास श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे चौक असे नाव यापुर्वीच्या सर्वसाधारण सभेतच देण्यात आलेला आहे. सदरील ठिकाणी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा पूर्णाकुती पुतळा उभारण्या बाबत परिसरातील नागरीकांकडून मागणी होत आहे.

करीता नागरीकांची मागणी विचारात घेता वॉर्ड क्र.८९, ज्योतीनगर अंतर्गत विश्वरुप हॉल समोरील चौकात श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा.

यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सूचकः- श्री.गिरजाराम हाळनोर. अनुमोदकः- श्रीमती प्राजक्ता भाले.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक २५३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्व साधारण सभा दिनांक व विषय क्रमांकाप्रमाणे नागेश्वरवाडी येथील सारस्वत बैंकेसमोरील खुल्या जागेत वीर बाजीप्रभु देशपांडे यांचा पुतळा बसविण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुर झालेला असून पुतळा बसविण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यांत आलेली नसल्याने पुतळा बसविण्याचे काम आज पर्यंत झालेले नाही.

तरी नागेश्वरवाडी येथील सारस्वत बैंकेसमोरील खुल्या जागेत वीर बाजीप्रभु देशपांडे यांचा पुतळा बसविण्यासाठी मनपा अर्थसंकल्प २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये २० लक्षाची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे.

अनुमोदकः- श्री.रेणूकादास (राजु) वैद्य, श्री.समीर राजुरकर, श्री. सुरेंद्र कुलकर्णी, श्री गोपाळ कुलकर्णी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दिनांक १८.०१.२०११ (२०.१२.२०१० ची तहकुब) मधील विषय क्रमांक १३० प्रमाणे मनपा मुख्यालयासमोर राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचा पुतळा बसविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला असुन परंतु शासन निर्णयानुसार रस्त्यावर नवीन पुतळा बसविता येत नाही त्यामुळे सदरील पुतळा मनपा मुख्यालयातील खुल्या जागेत बसविण्यासाठी तसेच पुतळा बसविण्यासाठी मनपा अर्थसंकल्प २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये १० लक्षाची आर्थिक तरतुद करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे. अनुमोदकः- श्री.गिरजाराम हाळनोर,श्रीमती सुनिता सोनवणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या संदर्भात महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी समितीत प्रशासनाचे दोन अधिकारी व सर्व पक्षीय गट नेता तसेच ज्या भागात पुतळा करावयाचा त्या वार्डाचे स.सदस्य समितीमध्ये समावेश करावे व समितीने अहवाल दयावा त्या अहवालनुसार तसेच शासन नियम व मा. न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३१ येथील जेष्ठ नागरिक स्व.मौलाना शौकत अली यांचे संपुर्ण जिवन गरीब लोकांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून समर्पित होते.मागील ४५ वर्षांपासुन ते गरीब मुलांसाठी मोमीनपुरा भागात ऊर्दु शाळा चालवित होते. शहरातील प्रतिष्ठित नागरिकांमध्ये त्यांचे नाव आदराने घेण्यात येत होते. मागील महिन्यांत त्यांचे दुःखद निधन झाल्याने ते राहत असलेल्या लोटा कारंजा येथील अंतर्गत गल्ली मरकज मस्जीद ते लेबर कॉलनी मेन रोड पर्यंत या अंतर्गत रस्त्यास "मौलाना शौकत अली मार्ग" असे नांव देण्यास प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्री.अब्दुल रऊफ खान(खलील खान). अनुमोदकः- श्री. मीर्झा सलीम बेग, डॉ.नुजहत तरन्नुम.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटा कारंजा येथील अंतर्गत गल्ली मरकज मस्जीद ते लेबर कॉलनी मेन रोड पर्यंत या अंतर्गत रस्त्यास "मौलाना शौकत अली मार्ग" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री. राजु शिंदे : ऐनवेळचे पुरवणी विषय घेण्यात येऊ.नये

**विषय क्रमांक २५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. दौलत किसन सलामबाद दै.वे. मजुर हे महानगरपालिका आस्थापनेवर दैनिक वेतनावर सन १९९३ पासुन कार्यरत होते. दिनांक २१ मे २०13 रोजी अपघात झाल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या डोक्यास जबर मार लागल्याने शस्त्रक्रियेसाठी व उपचारासाठी त्यांना दुनाखे हॉस्पिटल औरंगाबाद येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. शस्त्रक्रियेसाठी साधारणत: रुपये ०२.५० लक्ष खर्च अपेक्षित होता दैनिक वेतनावर कार्यरत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने ते एवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांनी उधार उसनवारी करुन हॉस्पीटलचा खर्च भरला होता तथापि दुर्दैवाने त्यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी व लहान मुले असून हॉस्पीटलाचा झालेला खर्च व उसनवारीचे पैसे देणे त्यांना शक्य होत नसल्याने व त्यांची दैनिक वेतनावरची महापालिकेतील २० वर्षाची सेवा याचा विचार करता महानगरपालिकेतर्फे त्यांच्या कुटूंबियाला रक्कम रुपये एक लक्ष (रु. १.०० लक्ष) आर्थिक मदत देणे बाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. सुशिल खेडकर अनुमोदक : श्री. बबन नरवडे, श्री. राजु शिंदे

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दैनिक वेतन मजुर कर्मचारी श्री. दौलत किसन सलामबाद यांचा अपघात होऊन औषधोपचार घेत असतांना निधन झाले. त्यांना उपचारासाठी लागलेला ०२.५० लक्ष अंदाजित खर्च व त्यांची आर्थिक परिस्थिती तसेच त्यांनी महानगरपालिकेत केलेली दैनिक वेतनावरील २० वर्षाची सेवा विचारात घेऊन त्यांच्या कुटूंबियाला नियमाप्रमाणे आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा** :

श्री.गिरजाराम हाळनोर :पावसाळा सुरू झाला कचरा साचलेला दिसतो उचलला जात नाही त्यामूळे डेग्यू व इतर साथीचे रोग पसरतात काय कार्यवाही होते..

श्री. त्रिंबक तुपे :अनेक भागात कचरा साचलेला दिसुन येतो पावसाळा सुरू झाला कचरा ओला होतो जागेवर सडतो व उचलल्या नंतर त्या जागेवर फवारणी किंवा पावडर टाकली जात नाही. प्रशासनाकडे या साठी कर्मचारी तसेच साहित्य नाही तसेच औषधीसाठी तरतुद नाही असे सांगितले जाते पावसाळा सुरू होवून १५-२० दिवस झाले अदयाप प्रशासनाने नियोजन का केले नाही.डेग्यु आजाराची उत्पत्ती होत आहे इतर साथीचे आजार वाढले तरी मनपाचे डॉक्टर रोगाची साथ नाही.असे सांगतात खाजगी डॉक्टर साथ आहे सांगतात.शहरातील नाले साफसफाई होत नाही नाल्याच्या कडेला कचरा टाकला जातो. त्यामूळे

दुर्गंधी पसरते पाहिजे तसे नाले/नाल्या साफ होत नाही. पावसाळा सुरू होतो तरी कार्यवाही सुरू नाही

श्री. मुजीब खान :अधिकारी कर्मचारी यांना फोन केला तर उचलत नाही माहिती देत नाही प्रत्येक वार्डात दोन-चार लेबर कामावर कमी असतात.जबाबदारीने कोणी काम करीत नाही मुख्य रस्ते साफसफाई होतात अंतर्गत रस्तेही साफ होणे आवश्यक आहे.प्रत्येक वार्डात किती लेबर ते काय काम करतात अधिकारी यांचे घरी जास्तीचे कर्मचारी दिले अधिकारी व वार्ड अभियंता यांनी येथे खुलासा करण्यासाठी उपस्थित असावे.

श्री.रेणुकादास वैद्य :काम करणारे वार्ड अधिकारी त्यांचेवर कन्ट्रोल करणारे घनकचरा व्यवस्थापक वैद्यकीय अधिकारी यांचे नियत्रंण आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे अनेक कामे असतात राज्य शासन केंद्र शासनाच्या योजना विविध कार्यक्रम असतात वेळ मिळत नाही.त्यासाठी उपआयुक्त दर्जाचे अधिकारी हे वार्ड अधिकारी यांचे वर नियत्रंण साठी नेमावे घनकचरा व्यवस्थापनासाठी नवीन अधिकारी नेमावे..शहरात डेंग्युची साथ सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी यांचेवर बरीच जबाबदारी आहे.

श्री माळवतकर महेश : सिडको हडकोत सात वर्षात कचरा वाढतोय आपले वैद्यकीय अधिकारी मी सांगेल तेच खरे असे समजतात. शहरात डेग्युची साथ आली मनपाचे डॉक्टर साथ नाही सांगतात या पुढच्या काळात अनेक प्रश्नाना सामोरे जावे लागणार आहे.ठेकेदार काम करीत नाही महापालिकेचा खर्च तर होतो कुणी तक्रार दिली की तेथेच फवारणी होते. आपत्तकालीन काळात महापालिकेकडे काय व्यवस्था आहे मोठा पाऊस पडण्याची शक्यता आहे लोकांच्या घरात पाणी गेले तर काय उपाययोजना करणार आपत्तकालीन परीस्थिती संदर्भात नियोजन करावे.तसेच सिडको हडको भागात रस्त्यात मोठे खाचखळगे पडले रस्ते दुरूस्त व्हावे. घनकचरा असेल आरोग्य असेल या बाबत प्रश्न उदभवू शकतो मागच्या रविवारी मोठा पाऊस झाला जेटींग मशिन उपलब्ध होऊ शकली नाही.

श्रीमती रेखा जैस्वाल : वार्डात ड्रेनेज लाईन चोकअप झाली १५ दिवस झाले जेटिंग मशीन मिळाले नाही माझ्या वार्डात एका पुतळा जवळ कचरा साचला केंव्हा उचलणार आहे अशा वेळेस विशेष अशी तरतुद असावी वेळेवर काम होईल.

डॉ नुझत तरन्नुम खान :वार्डात साफसफाई होत नाही.पाऊस सुरू झालेला आहे नाल्याची नालीची साफसफाई तातडीने व्हावी रोगराई पसरणार नाही दखल घ्यावी

श्री नासेर खान :साफसफाईच्या बाबतीत भेदभाव होतो कोणत्या वार्डसाठी किती लेबर यादी दयावी अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले तरी ऐकत नाही. आमच्या वार्डात ५ हजारचे काम होत नाही काही ठिकाणी ४ कोटीची

काम होत आहे माझ्या वार्डात ४ लेबर काम करतात १३ हजार लोकसंख्या आहे १७ वार्ड मिळून ५६ कर्मचारी काम करतात हा भेदभाव का होतो श्री.नाईकवाडे यांना फोन केला माहिति देत नाही अधिकारी ऐकत नसतील तर त्यांना परत पाठवावे.जे काम करीत नाही त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

संचालक(प्रांणी संग्रहालय):मी कोणासही सदस्यांला फोन केलेला नाही.

श्री.नासेरखान :साफसफाईच्या मुद्यावर बोललो घाण का होत आहे.

संचालक(प्रांणी संग्रहालय): सेक्यरीटी बंद झाली वाहन नाही दोन कर्मचारी एसआय व एक लेबर काम करीत आहे सर्वच ठिकाणी दोन कर्मचारी काम करणार नाही. स.सदस्यांच्या तक्रारी आहेतच

श्री काशिनाथ कोकाटे :या भागात दोन कर्मचारी असेल तर साफसफाई होणार नाही पावसाळयात अवैध मार्गाने कत्तल होते असे सांगितले कत्तल अवैध होत असेल तर योग्य नाही पउेगाव येथे सुविधा दिल्या तर तेथे शिप्ट करावे पडेगाव मिटमिटा येथे सर्व सुविधा असेल तर  अडचण निर्माण होणार नाही.

श्रीमती प्राजक्ता राजपुत: पावसाळा सुरु आहे. प्रत्येकाच्या वॉर्डात कचऱ्याची समस्या प्रशासनाचे लक्ष नाही कर्मचारी काम करीत नाही डेंग्यू सारखे मोठे आजार होत आहे फवारणी रेग्युलर होत नाही कर्मचारी वाढवून दयावे घंटा गाडया देण्यात याव्यात कचरा उचलण्यासाठी नियोजन करावे तसेच बी ओ टी वरील लाईट बंद असतात

श्रीमती सविता सुरे :वार्डात फवारणी होत नाही रस्त्यात खड्डे पडले. काम व्हावे.

श्रीमती आशा मोरे :वार्डत साफसफाई होत नाही लेबर कमी आहे.

श्रीमती प्राजक्ता राजपूत:मोठा पाऊस झाला तर लोकांच्या घरात पाणी शिरेल

श्रीमती प्रिती तोतला :प्रत्येक वार्डात लेबर पाहिजे खाजगी संस्थे मार्फत काम करून घेता त्यांना पैसे देतो लेबरची भरती करावी महापालिकेचे ५०लक्ष रूपये वाचतील. शहरात डेग्युची साथ आहे २-३ महिण्यापूर्वी शासनाने स्त्रीभ्रुण हत्या विषयी जी मान्यता कम्पलसरी केली होती शहरात काही भागात १० दिवसापासून ती नोंदणी बंद आहे.पुंडलिकनगर भागात आरोग्य विभागात एमटीसी  नंबर देणे बंद आहे जो पर्यंत नंबर मिळत नाही तोपर्यंत खाजगी दवाखान्यात उपचार होत नाही उशीर होतो त्या कालावधीत महिलांना मानहानी झाली तर कोण जबाबदार असणार आहे डेंग्यू असेल तरी महापालिकेचे अधिकारी नाही म्हणून सांगतात.एमटीसी  नंबर देणे का बंद आहे?

आरोग्य वैद्य. अधि. :एमटीसी सिस्टम ही आरसीएच प्रकल्पा अंतर्गत येते  त्याचे प्रमुख डॉ.पाडळकर हया आहेत ते काम पाहतात.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रत्येक वेळेस प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे काम माझ्याकडे नाही असे सांगून  जबाबदारी झटकतात हे योग्य नाही दिशाभूल करून

पदावर राहण्याची सवय लागली ती वाईट आहे संबधीत अधिकारी यांची मा.न्यायालयात प्रकरण दाखल आहे मा.न्यायालयाचे हेच म्हणणे आहे की जे काही शिक्षण इतर गोष्टी पात्रतेसाठी आहे त्या बाबत रितसर प्रस्ताव पुढील सभेत ठेवावा.

श्रीमती किर्ती शिंदे : पावसामुळे खुप गड्डे पडले साफसफाई मजूर देण्यात यावे वॉर्ड ऑफीसर सुध्दा जातीने लक्ष देत नाही

श्री विरभद्र गादगे : वार्ड स्तरावर मी बैठक घेतली सिडकोचा भाग सिडकोकडे होता तेंव्हा वेळेवर साफसफाई होत होती बचत गटाने काम बंद केले आता पुन्हा पत्र तसे त्यांनी दिले फवारणीच्या बाबतीत २ पत्र दिले वार्डात ड्रेनेज लाईन रस्त्यावर वाहते नागरीकांना त्रास होतो काय कार्यवाही केली..

श्री त्रिंबक तुपे :किती वार्डात खाजगी एजन्सीकडून स्वच्छता होते तसेच फवारणी साठी खाजगी एजन्सीने किती ट्रॅक्टर लावले सर्व माहिती द्यावी.

श्री. किशोर नागरे :बचत गटाच्या कर्मचारी यांना किती दिवसापासून पेमेंन्ट दिले नाही तसेच सिडको हडको भागातील स्वच्छतेचे नियोजन करावे

श्री. महेश माळवतकर : सिडकोतील बचतगटाचे कर्मचारी यांचे पेमेंट वेळेवर होत नाही किती महिन्यापासून थकले खुलासा करावा.

श्री संजय चौधरी :वार्डात फवारणीचे कामावर कोणत्या अधिकारींचे नियंत्रण आहे फवारणीसाठी असलेले औषधाचे नमुने मागितले दिले नाही नागरीकाच्या आरोग्यासाठी फवारणी व्हावी ठेकेदाराच्या भल्यासाठी नव्हे माहिती देत नाही शंका निर्माण होते.

श्री.अनिल जैस्वाल :एकच दिवस फवारणी होते.

उपआयुक्त (म) :साफसफाई वर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकारी यांची नियुक्ती केली आहे हॅण्डग्लोज मिळाले ते वाटप करण्यात येईल कालच माल प्राप्त झाला.ज्याची तक्रार असेल ती नोंदवून घेतली जाईल

श्री त्रिंबंक तुपे :प्रत्येक वार्डात देण्यात यावे

श्री गिरजाराम हाळनोर :कन्ट्रोल कोण ठेवणार आहे किती कर्मचारी वार्ड निहाय दिले त्यावर कुणाचे नियंत्रण असणार आहे

श्री अफसर खान : कचरा उचलला जात नाही तीन महिन्या पासून बोलतो वार्ड अधिकारी ऐकत नाही लेबर नाही तर नियेजन कसे करणार आहे.कोणत्या वार्डात किती लेबर आहे माहिती दयावी. कोणत्या वार्डात किती लेबर आहे.

श्री. त्रिबंक तुपे :नियोजन करावे जेथे कमी लेबर आहे तेथे वाढीव दयावे

डॉ.जफर खान :लेबरला गणवेश, कार्यालयाचे ओळख पत्र द्यावे तसेच कुणी कुणाच्या बदलीत काम करीत आहे का यावर ही नियत्रंण असावे

उपआयुक्त (म) : ज्या वार्डात लेबर कमी तेथे वाढवून दिले जाईल नियंत्रण अधिकारी नियुक्त केले ते जे अडचणी असतील ते आयुक्तांना निदर्शनास आणून देतिल.

श्री. सुशिल खेडकर :वार्ड वाईज लेबरचे नियोजन करावे

| | |
|---|---|
| श्री.नासेर खान | :माझ्या वार्डात किती लेबर कार्यरत आहे माहिती दयावी |
| मा.महापौर | :स्वच्छतेच्या बाबत वार्ड अधिकारी व संबधीत अधिकारी यांची बैठक घेवून स.सदस्याचे ज्या समस्या असतील त्या सोडविल्या जातील प्रत्येक वार्डात लेबर जास्तीचे देण्यात यावे तसेच वार्ड अभियंता वार्ड अधिकारी यांनी बैठकीला उपस्थित राहावे. |
| श्री.गजानन बारवाल | :संत एकनाथ रंग मंदीर सुशोभिकरणाचा प्रस्ताव मागच्या बैठकीत होता त्यास मंजूरी दयावी |
| उपआयुक्त (म) | :एमटीसी चे अधिकारी यांना बोलवून त्यांचा खुलासा घेवून योग्य ती कार्यवाही केली जाईल तेथे सुविधा उपलब्ध करून दिली जाईल |
| श्री.विजय वाघचौरे | :क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील लाईट बंद आहे |
| श्री.महेश माळवंतकर | :आपण पैसे देतो लाईट चालु नसतात टी व्ही सेन्टर ते सलीम अली सरोवर,जाधववाडी रस्ता,हडको कॉर्नर , सेव्हनहिल रस्ता रामा हॉटेल ते एन -५ या रस्त्यावरील लाईट बंद, राणाची मंगल कार्यालय समोरील लाईट बद आहे. |
| श्रीमती प्राजक्ता राजपूत | :मिलकॉर्नर ते औरंगपूरा रस्त्यावरील किती लाईट बंद आहे |
| श्रीमती प्रिती तोतला | :लाईट बंद असल्यास १० पट दंड संबधीत एजन्सीकडून वसुल करावे |
| श्री.विजय वाघचौरे | :बीओटीचे लाईट बंद असून त्यावर कुणाचे नियंत्रण आहे. |
| श्री.राजूशिंदे | :बीओटी तत्वावर असलेले लाईटवर कुणाचे नियंत्रण आहे पावसामुळे लाईट बंद होते अशी उत्तरे मिळतात हे सत्य आहे का एका ठिकाणचे लाईट काढून दुसरीकडे बसविण्यात येतात याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सर्व भागात तातडीने लाईट लागतील कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे एजन्सी काम करीत नसेल तर नियमानुसार कार्यवाही करावी. महापालिकेने लाईटचे काम करावे. |
| कार्य.अभियंता(बीओटी): | : बीओटीवर शहरातील लाईटचे काम एजन्सीकडे दिले शहरात ५००० व सिडको हडको तील ४५०० असे एकूण ९५०० लाईट आहे या ठिकाणी वारवांर काम करण्यात येते अंडर ग्राऊड केंबला प्रॉब्लेम निर्माण होतो त्यामूळे अडचणी येत आहे मुख्य रस्त्यावरील लाईटचे काम हे एनर्जी सेव्हींगं वर आहे पोल ही आहे काम मुख्य रस्त्यावरील लाईट आहे.१२-१५ दिवसात पुर्ण लाईट सुरू होतील |
| श्री.राजू शिंदे | :महापालिकेच्या वतीने काम करावे बीओटीवरील काम बंद करावे |
| श्री किशोर नागरे | : कॉन्ट्रॅक्टर ची ऑर्डर संपलेली आहे. |
| मा.महापौर | :प्रत्येक वार्डातील लाईट चालू करावे. सुरू न केल्यास १० पट दंड आकारण्याची कार्यवाही व्हावी |
| श्री.किशोर नागरे | :माझे वार्डात कॉम्प्रेसिव्ह पध्दतीचे लाईटचे काम आहे २०-५-२०१३ रोजी ठेकेदाराची मुदत संपली त्यांना अदयाप मुदत दिली नाही संबधीताच वर्कऑर्डर द्यावी. |
| श्री.राजू शिंदे | :स.सदस्यांचे पत्राचे उत्तर दिले जात नाही. |

उपआयुक्त (म) :संबधीत अधिकारी यांना सुचना देण्यात येतील

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक रस्त्यांचे डांबरीकरण झाले नाही पॅचवर्क झाले नाही कोणते काम केले कुठे केले याची माहिती नाही काम का झाले नाही २ ते अडीच कोटीचे पॅचवर्कचे काम झाले नाही पेमेंन्ट केले.

उपआयुक्त (म) : काम न होता पेमेंन्ट दिले असेल तर चौकशी करण्यात येईल .स.सदस्यांच्या पत्रानुसार ज्यांनी माहिती दिली नाही त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल

डॉ जफर खान :शहरातील अनेक रस्त्यावर खाचखळगे पडले पॅचवर्कचे काम सुध्दा होत नाही

श्री अफसर खान :रस्त्याची कामे बरोबर झालीकी नाही यात भ्रष्टाचार झाला चौकशी होणार होती. ऑडीटसाठी शुल्क भरायचे होते ते का भरले नाही.

श्री मुख्यलेखधिकारी :या बाबत मा. आयुक्तांशी चर्चा झाली चेक दिला नाही तयार आहे लवकरच कार्यवाही केली जाईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.